जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २९ | रविवार, ३ ऑगस्ट २०२५ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210



BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER




## कोंढरी व नांदगाव येथील सरपंचांचा राष्ट्रवादीत प्रवेश

**इम्रान अत्तार**

भोर, ता. ०२ : भोर महाड रस्त्यावरील कोंढरीचे सरपंच अजित पारठे व नांदगाव येथील सरपंच भागाश्री चऱ्हाटे यांच्यासह गावातील कार्यकत्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात प्रवेश केला आहे.

जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीच्या तोंडावर पक्ष प्रवेश झाला. यावेळी आमदार शंकर मांडेकर, जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष रणजित शिवतरे, भोर तालुका अध्यक्ष संतोष घोरपडे, माजी उपसभापती विक्रम खुटवड, माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत बाठे यांच्या प्रमुख उपस्थितीत नांदगाव येथील कार्यकर्त्यांनी रणजीत शिवतरे यांच्या विकास कामावर प्रभावित होऊन प्रवेश केला.

भोर तालुक्यातील नांदगाव गावातील सरपंच भाग्यश्री गणेश चऱ्हाटे, दिलीप कुडले, प्रकाश कुडले, मोहन मांढरे, किसन कुडले, शंकर कुडले, पंढरीनाथ चहराटे, विजय चऱ्हाटे, मारुती मारणे, दिनकर खोपडे, अरुण चऱ्हाटे, शशिकांत खुटवड, अशोक भातुसे, बंटी चऱ्हाटे, रावसाहेब चऱ्हाटे, प्रशांत जगताप, मिलिंद जगताप, संतोष कुडले, भरत कुडले, संभाजी कुडले, सुनील कुडले यांनी प्रवेश केला.

कोंढरी गावचे सरपंच अजित पारठे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात प्रवेश केला आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादीत प्रवेश होत असल्यामुळे शिंद भोलावडे गटात राष्ट्रवादीला बळ मिळणार आहे.

# सिंहगड परिसरात तरुणाईची पावले गुन्हेगारीकडे..?

## भौतिक सुखामागे धावणाऱ्या तरुणांचे प्रबोधन करणे गरजेचे - रमेश बापू कोंडे

**विशाल भालेराव**

खडकवासला, ता. ०२ : ऐशोरामी जीवन जगण्याच्या स्वप्नात असलेल्या तरुणाईची पावले दिवसेंदिवस गुन्हेगारी जगताकडे ओढली जात असल्याचे गेल्या काही वर्षांपासून दिसून येत आहे. आतापर्यंत हवेली पोलिसांनी विविध गुन्ह्यांत अटक केलेल्या गुन्हेगारांमध्ये १८ ते २५ वर्षे वयोगटातील मुलांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. काही बालगुन्हेगार असल्याचेही निष्पन्न झाले आहे. शिक्षण व कामधंद्यांकडे दुर्लक्ष करुन ही तरुणाई गुन्हेगारी जगताकडे का वळत आहे? हे शोधून तरुणाईत प्रबोधन होणे गरजेचे वाटू लागले आहे.

गेल्या काही वर्षांत दुचाकी चोरी, सोनसाखळी चोरी, रस्तालूट, घरफोड्या, खंडणी, मुलींची छेडछाड, अत्याचार, विनयभंग, दहशत पसरवणे या प्रकारच्या गुन्ह्यात लक्षणीय वाढ झाली आहे. बाल गुन्हेगारीत चांगलीच वाढ झालेली आहे. या वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा एकतरी कमी पडत आहे. मोठे गुन्हेगारांचे आकषर्ण ही मुले आमलात आणत असतील तर आशा गुंडावर प्रशासकीय यंत्रणेचा अंकुश आहे ? त्यामुळे गुन्हेगार व्हाईट कॉलरने खुलेआम प्रशासकीय यंत्रणेच्या नाकावर टिच्चून बाल गुन्हेगारांना घेऊन गुन्हे करीत आहेत.

त्यामुळे छोटा गुन्हा करणारा गुन्हेगार गुन्हेगारीचे एकावर एक टप्पे पार करीत समाजात स्वतःची दहशत निर्माण करीत असल्याचे दिसून येत आहे. गेल्या काही वर्षात पोलीस प्रशासनाने अनेक गुन्ह्यांची उकल करीत अनेक गुन्हेगारांना जेरबंद केलेले आहे. यातील बहुतांश गुन्हेगार हे १८ ते २५ वयोगटातील आहेत. तर



काही बालगुन्हेगार आहेत. मोठ्या गुन्ह्यातील बालगुन्हेगारांना काही काळ बालसुधारगृहात ठेवून सोडून देण्यात येते तर छोट्या गुन्ह्यातील बालगुन्हेगारांना अटक न करताच समज देऊन सोडून देण्यात येते. त्यामुळेच या बाल गुन्हेगारांच्या गुन्हेगारी प्रवृत्तीला बळ मिळते तर विविध गुन्ह्यातील आरोपी अटक होऊनही जामिनावर बाहेर येऊन साक्षी पुराव्याअभावी निर्दोष सुटून गुन्हेगारी जगतात आपले स्थान निर्माण करीत आहेत.

१८ ते २५ वयोगटातील तरुणाई शिक्षण व कुटुंबाला कामधंद्यात मदत करण्यापेक्षा भौतिक सुखांना बळी पडत आहेत. महाविद्यालयात, माध्यमिक विद्यालयात शिक्षण घेणारे काही विद्यार्थीही छंदी फंदी व ऐशोरामी जीवनाचे स्वप्न पहात झटपट लखपती होण्यासाठी गुन्हेगारीचा मार्ग अवलंबत आहेत. काबाडकष्ट करणारे आईवडील आपला पाल्य शिकतो आहे, या आशेने त्याचे कोडकौतुक करीत असतात. मात्र त्या पाल्याला भौतिक सुख खुणावत असल्याने तो गुन्हेगारीकडे वळला जातो.

पूर्वी शहरी भागात ही प्रवृती दिसून येत होती. मात्र आता तिची बिजे ग्रामिण भागातही खोलवर रुतली जात आहेत. शहरी भागातील विद्यार्थ्यांचे झकपक राहाणीमान, पॉकेट मनी, महागड्या दुचाक्याचा वापर ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना हवाहवासा वाटू लागल्याने त्यांची पावले गुन्हेगारी जगताकडे वळत असल्याचे दिसून येत आहे. शहरी भागातील पोहचलेला गुन्हेगार त्यांचा वापर करुन घेत स्वतःचे गुन्हेगारी विश्व मजबूत करताना दिसत आहे. मात्र सर्वसामान्य जनतेला या गुन्हेगारी प्रवृत्तीचा त्रास होऊनही निमूटपणे सहन करावा लागत आहे.

> हल्ली पोलिसांनी गुन्ह्याची उकल करुन अटक केलेले बहुतांश गुन्हेगार हे १८ ते २५ वयोगटातील असल्याने ही चिंतेची बाब आहे. भविष्यातील देश घडवणारा तरुणच गुन्हेगारीकडे वळला जात असल्याने त्यावर गंभीरपणे मंथन होऊन भौतिक सुखामागे धावणाऱ्या या तरुणाईसाठी प्रबोधन होणे गरजेचे आहे.
>
> - **रमेश बाप्पू कोंडे** - जिल्हाध्यक्ष पुणे जिल्हा, शिवसेना शिंदे गट

## यवत दगडफेक व जाळपोळ प्रकरणी ५ गुन्हे दाखल : पोलीस अधीक्षक संदिप सिंह गिल्ल

**यवत, ता. ०३ :** यवत येथे आक्षेपार्ह पोस्टमुळे झालेल्या दगडफेक व जाळपोळ प्रकरणी पाच गुन्हे दाखल करण्यात आले असून काहींना ताब्यात घेण्यात आले आहे.

या घटनेत नागरिकांना कोणत्याही प्रकारची इजा झाली नाही सर्व ठिकाणचे पंचनामे झाले असून गावात पूर्ण शांतता असून पोलिसांच्या वतीने सर्वत्र चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे अशी माहिती पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदिप सिंह गिल्ल यांनी पत्रकार परिषदेत दिली.

गावामध्ये सर्व समाज हा एकत्र वावरत होता परंतु आक्षेपार्ह पोस्ट पडल्याने काही काळ तणावाचे वातावरण झाले होते परंतु आज यवत परिसरात सर्वत्र शांतता आहे.

सध्या काही जणांना ताब्यात घेतले असून गुन्हा बाबतची अधिक माहिती तपासणीनंतर दिली जाईल, यवत परिसरात नागरिकांनी कायदा व सुव्यवस्थेचे पालन करावे असे आवाहन त्यांनी यावेळी संदिप सिंह गिल्ल यांनी केले.

## बारामतीकरांना शिस्त लावण्यासाठी आता 'घोषणारिक्षा'

### बारामती वाहतूक पोलिस आणि नगरपालिका यांचा संयुक्त उपक्रम

**बारामती, ता. ०२ :** 'वाहतूक नियम पाळा... चुकीचे पार्किंग करू नका...गर्दी करू नका... अशा विविध घोषणा ऐकायला मिळाल्या की समजायचं, 'घोषणारिक्षा' आली आहे. कारण ही घोषणारिक्षा तुम्हाला वाहतूक नियमही सांगते आणि सांगूनही न ऐकल्यास चांगला भुर्दंड बसवून धडाही शिकवते. बारामती वाहतूक शाखा आणि बारामती नगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने रस्त्यावर शिस्त आणण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर एक रिक्षा शहरभर फिरतेय, त्यावर मोठे फलक झळकत आहेत आणि लाऊडस्पीकरवरून नागरिकांना सूचना दिल्या जात आहेत. कुठे गाडी लावून अडथळा केला, कुणी नियम




तोडले तर त्यावर तात्काळ कारवाई केली जात आहे.

चार दिवसांपूर्वी झालेल्या दुर्दैवी अपघातानंतर पोलिसांनी नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणखी गांभीर्याने पाऊले उचलली आहेत. रस्त्यावर उतरून वाहतूक पोलीस नागरिकांना सजग करत आहेत. या 'मोठ्या आवाजातल्या' मोहिमेला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळतोय. गर्दी कमी होते आहे, रस्ते मोकळे होतायत, आणि लोकही आता काही प्रमाणात का होईना नियम पाळताना दिसत आहेत.

रस्त्यांवर अस्ताव्यस्त उभ्या असलेल्या वाहनांना हटवून सार्वजनिक ठिकाणांवरील गर्दी कमी करण्यात येत आहे. नियम न पाळणाऱ्या वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई केली जात असून, नागरिकांना पूर्वसूचना दिल्यानंतरही अडथळा करणाऱ्यांवर कठोर पावले उचलली जात आहेत. शहरातील नागरिकांकडून या मोहिमेस उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असून, नागरिकांचा खडतर प्रवास अधिक सोपा होण्यास मदत होत आहे.

या अभियानामध्ये पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांची सक्रिय भूमिका असून, त्यांच्या संकल्पनांमुळे वाहतूक शाखेबद्दल विश्वास वाढला आहे. अपघात टाळण्यासाठी सुरू करण्यात आलेली ही मोहिम पुढील काळात शहरात सातत्याने राबविण्यात येणार आहे. वाहतूक नियमांची अंमलबजावणी होण्यासाठी प्रशासनाने उचललेली ही पावले भविष्यातील संभाव्य अपघात टाळण्यास नक्कीच मदत करतील, असा विश्वास यादव यांनी व्यक्त केला आहे.

> वाहतूक नियमांचे कोणी पालन करत नसल्यास ९९ २३ ६३० ६५२ या क्रमांकावर कळवावे. कारवाई करण्यात येईल.
>
> - **चंद्रशेखर यादव,** पोलीस निरीक्षक, बारामती वाहतूक शाखा.

## बलात्कार प्रकरणात माजी खासदार प्रज्वल रेवण्णा यांना जन्मठेप

**कर्नाटक, ता. ०२ :** हसन (कर्नाटक) येथील जनता दल (सेक्युलर) पक्षाचे माजी खासदार प्रज्वल रेवण्णा यांना बलात्कार प्रकरणात दोषी ठरवून विशेष न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. न्यायालयाने १ ऑगस्ट रोजी निर्णय देत रेवण्णा यांना भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६(२) आणि ३७६(२)(एन) अंतर्गत गुन्हेगार ठरवले.

या शिक्षेसोबतच न्यायालयाने रेवण्णा यांना १० लाख रुपयांचा दंड ठोठावला असून, त्यापैकी ७ लाख रुपये पीडितेला भरपाई म्हणून देण्याचे आदेश दिले आहेत. बेंगळुरूमधील लोकप्रतिनिधींविरोधातील गुन्ह्यांची सुनावणी करणाऱ्या विशेष न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी झाली. निकाल ऐकून प्रज्वल रेवण्णा न्यायालयाच्या आवारात भावुक झाले असल्याचे सांगण्यात येते.

## लाडक्या बहिणींना रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला खात्यात पैसे जमा होणार

**महाराष्ट्र, ता. ०२ :** राज्य सरकारच्या महत्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत जुलै महिन्याचा हप्ता रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला, म्हणजेच ८ किंवा ९ ऑगस्ट २०२५ रोजी, पात्र महिलांच्या बँक खात्यात जमा होणार आहे. महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी याबाबत घोषणा केली आहे. या योजनेअंतर्गत २१ ते ६५ वयोगटातील पात्र महिलांना दरमहा १५०० रुपये थेट त्यांच्या बँक खात्यात सन्मान निधी म्हणून जमा केले जातात.



आदिती तटकरे यांनी माहिती देताना सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या सर्व पात्र लाभार्थ्यांना रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येस जुलै महिन्याचा सन्मान निधी १५०० रुपये वितरित करण्यात येणार आहे.

रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येस सर्व पात्र लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात सन्मान निधीची रक्कम थेट लाभ हस्तांतरणाद्वारे जमा करण्यात येईल.' अशी घोषणा तटकरे यांनी केली आहे.या घोषणेमुळे राज्यातील लाखो महिलांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. ज्या महिलांचे आधार कार्ड त्यांच्या बँक खात्याशी जोडलेले आहे, त्यांनाच या योजनेचा लाभ मिळेल. जर तुमचे आधार कार्ड बँक खात्याशी जोडलेले नसेल, तर लवकरात लवकर ते जोडून घ्यावे, असे आवाहनही सरकारकडून करण्यात आले आहे.

दरम्यान, लाडक्या बहिणींना जुलै आणि ऑगस्टचा हप्ता एकत्र येईल, अशी अपेक्षा होती. मात्र, ऑगस्टच्या हप्त्याबाबत कोणतीही घोषणा झालेली नाही. त्यामुळे लाडक्या बहिणींना एकाच महिन्याचा हप्ता मिळणार आहे.

## हडपसर रेल्वे स्टेशन परिसरात पिस्तुलासह एक जण ताब्यात; मुंढवा पोलिसांची कामगिरी

**मुंढवा, (पुणे), ता. २ :** हडपसर रेल्वे स्टेशनजवळील किर्तनेबाग परिसरात एका इसमाकडून मुंढवा पोलिसांनी पिस्तुल व जिवंत काडतूस जप्त केली आहेत. गुरुवारी (ता. ३१) रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास हि कारवाई करण्यात आली आहे. राहुल संजय देटके (वय -२३, रा. म्हसोबा वस्ती, विजयनगर, लेन नं.-२, मांजरी बुद्रुक, पुणे) असे ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपी इसमाचे नाव आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंढवा पोलीस ठाण्यातील पोलीस हवालदार विनोद सांळुके यांना गोपनीय माहिती मिळाली की, किर्तनेबाग येथे सार्वजनिक रस्त्यावर एक इसम पिस्तुल व जिवंत काडतूसासह संशयास्पदरीत्या उभा आहे. सदर माहितीची तत्काळ दखल घेत तपास पथक प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक राजू महानोर यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती देत तातडीने कारवाई सुरू केली.

पोलिसांनी त्या इसमाला ताब्यात घेत त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे एक देशी बनावटीचे पिस्तुल व एक जिवंत काडतूस आढळून आले. याप्रकरणी आरोपी राहुल देटके याला रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास अटक करण्यात आली. त्याच्याविरुद्ध मुंढवा पोलीस स्टेशन येथे गु. र. नं. २१३/२०२५, शस्त्र अधिनियम कलम ३(२५) व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१) सह १३५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगीरी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली मुंढवा पोलीस ठाण्याच्या वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती माया देवरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) बाबासाहेब निकम यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे प्रभारी सहायक पोलीस निरीक्षक राजु महानोर, पोलीस उपनिरीक्षक युवराज पोमण, सहायक फौजदार राजु कदम, पोलीस हवालदार विनोद सांळुके, शिवाजी धांडे, पोलीस अंमलदार अक्षय धुमाळ, स्वप्नील रासकर, रुपेश तोडेकर, यांचे पथकाने केली.

# कथित पत्रकाराने पोलिस कर्मचाऱ्याच्या मदतीने मांडवली केल्याच्या तक्रारी

**महेंद्र शिंदे**

खेड शिवापूर, ता. ०२ : राजगड पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका चौकीतून अत्यंत गंभीर आणि धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या चौकीतील एका पोलिस कर्मचाऱ्याच्या मदतीने एका तथाकथित पत्रकाराने रात्रीच्या वेळेस नागरीकांच्या दुकानांवर जाऊन तसेच चौकीत येणाऱ्या नागरीकांकडून मांडवली केल्याच्या नागरीकांच्या तक्रारी आहेत. या प्रकारामुळे पोलिस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे, संबंधित पत्रकार काही काळ या चौकीतच थांबून पोलिसी ढंगात वावरत होता. चौकशीसाठी बोलावलेल्या काही नागरीकांना तर त्याने थेट मारहाण केल्याचे काही नागरीकांचे म्हणणे




आहे. या प्रकारामुळे स्थानिक नागरीक तीव्र संताप व्यक्त करत आहेत.

दोन दिवसापूर्वी या विषयावरच पाषाण येथील पुणे ग्रामीण पोलिस अधीक्षक कार्यालयात रीपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) कामगार आघाडी तर्फे आंदोलन करण्यात आले होते. त्यांनतर राजगड पोलिस ठाण्याच्या हद्दीतील अनेक नागरीकही त्यांना या कथित पत्रकार, पोलिस कर्मचारी आणि झिरो पोलिस यांचे आलेले अनुभव खाजगीत व्यक्त करत आहेत.

हा पत्रकार गेले अनेक महिने या चौकीत काय करत होता. त्याला कोणी आणला? तो कोणाच्या मदतीने ही पोलीसिंग आणि मांडवली करत होता? राजगड पोलिस ठाण्याच्या वरिष्ठांना गेल्या अनेक दिवसात हा प्रकार दिसला नाही का? अशी चर्चा राजगड पोलिस ठाण्याच्या हद्दीत सुरू आहे. या प्रकरणाची चौकशी करून संबंधित पत्रकार आणि पोलिस कर्मचाऱ्यावर काय कारवाई केली जाणार याकडे सर्वांचं लक्ष लागून राहिले आहे. सबंधित प्रकाराची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. दरम्यान, राजगड पोलिस ठाण्याच्या मनमानी कारभाराविरोधात रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) कामगार आघाडीतर्फे पुणे ग्रामीण पोलिस अधीक्षक कार्यालयात जोरदार बोंबाबोंब आंदोलन करण्यात आले होते. यावेळी पोलिसांच्या मदतीने चौकीत येणाऱ्या नागरीकांशी हस्तक्षेप करणाऱ्या पत्रकारावर कारवाई आणि पोलिस अधिकारी व कर्मचारी यांच्या बदलीची मागणी करण्यात आली होती.

### कथित पत्रकार पुन्हा पोलिस चौकीत

दोनच दिवसांपूर्वी तथाकथित पत्रकार, पोलिस कर्मचारी आणि झिरो पोलिस यांच्या तक्रारी पुणे ग्रामीण पोलिस अधीक्षक संदीप सिंह गिल यांच्याकडे करण्यात आल्या आहेत. असे असताना हा कथित पत्रकार शुक्रवारी सायंकाळी पुन्हा राजगड पोलिस ठाण्याच्या चौकीत वावरत असल्याचे अनेक स्थानिक नागरीकांनी सांगितले. यावरून राजगड पोलिसांना या प्रकाराचे गांभीर्य नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे आतातरी वरिष्ठ पोलीस काय कारवाई करणार याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# दत्तात्रय भरणेंचं अजब विधान, अधिकाऱ्यांना 'वाकड्या तिकड्या' कामाचा सल्ला



**मुंबई, ता. ०२ :** इंदापूरचे आमदार दत्तात्रय भरणे यांनी नुकताच महाराष्ट्राचे कृषीमंत्री म्हणून पदभार स्वीकारला आहे. मात्र, पदभार स्वीकारताच त्यांनी केलेल्या एका वक्तव्यामुळे नवीन वाद निर्माण झाला आहे. इंदापूर येथील महसूल दिनाच्या कार्यक्रमात भरणे यांनी उपस्थितांना दिलेल्या एका सल्ल्याने उपस्थितांच्या भुवया उंचावल्या. यावेळी ते म्हणाले की, सरळ काम सगळेच करतात, पण एखादं काम वाकडं करून परत ते सरळ जे करतात, त्याची माणसं नोंद ठेवतात. असं वक्तव्य त्यांनी केलं आहे. त्यांच्या याच वक्तव्यामुळे राज्यात नव्या वादाला तोंड फुटले आहे.

पदभार स्वीकारताना भरणे यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी नव्या योजना आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून दीर्घकालीन उपाययोजना राबवण्याचे आश्वासन दिले असले, तरी त्यांच्या या वक्तव्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. यापूर्वी माणिकराव कोकाटे यांच्या वादग्रस्त वक्तव्यांमुळेच त्यांच्याकडून कृषी खाते काढून घेण्यात आले होते. आता भरणे यांच्या या वक्तव्याने महायुती सरकारमधील नेत्यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. याबाबत भरणे यांनी अद्याप कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही.

दरम्यान, महसूल दिनासारख्या गंभीर प्रसंगी महसूल विभागाकडून पारदर्शकता आणि प्रामाणिकपणाची अपेक्षा असताना, मंत्र्यांनी काम वाकडं करून परत सरळ करण्याचा सल्ला देणे योग्य आहे का, अशी आता चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. दरम्यान, त्यांच्या या विधानावर आता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काय प्रतिक्रिया देतात हे पाहणे महत्वाचे आहे.

# भोर तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करा; जय शिवराय किसान संघटनेची मागणी

**विशाल शिंदे**

भोर, ता. ०२ : तालुक्यात यंदा पावसाच्या असममित आणि सततच्या धार स्वरूपामुळे खरीप हंगामाचे अतोनात नुकसान झाले असून, अनेक शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. या पार्श्वभूमीवर जय शिवराय किसान संघटना, शिव प्रहार आणि बळीराजा शेतकरी संघटना यांच्या वतीने भोर उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, कृषी व वन विभाग यांना निवेदन सादर करून तातडीने पंचनामे करण्याची आणि शासनाला अहवाल सादर करण्याची मागणी करण्यात आली आहे.



निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, पावसाची सुरुवात वेळेआधी झाल्याने ६० ते ७० टक्के क्षेत्रात मशागतच होऊ शकली नाही. काही शेतकऱ्यांनी वापशावर पेरण्या केल्या, मात्र सततच्या पावसामुळे उगम फारच कमी राहिला. दुबार पेरणीनंतरही उगम न झाल्याने १०० टक्के नुकसान झाल्याची उदाहरणे दिसत आहेत.

भुईमुगावर तांबीरा रोग, सोयाबीनची वाढ खुंटलेली, भाताच्या रोपांचे नुकसान, फळपिकेव भाजीपाला सडून जाणे अशा समस्या समोर आल्या आहेत. याशिवाय, रानडुक्कर, मोर, गोगलगाय आणि डोंगर भागातील बिबट्यांमुळे शेती आणि पाळीव प्राण्यांचेही मोठे नुकसान झाले आहे.

अनेक शेतकऱ्यांनी बी-बियाणे, खते, औषधे उधारीवर घेतली असून, पीककर्ज, सोने तारण कर्ज घेतले आहे. मात्र, उत्पादन न झाल्यामुळे या कर्जाची परतफेड शक्य नाही, हे वास्तव समोर आले आहे. महसूल विभागाच्या ऑनलाईन प्रणालीत अडथळ्यांमुळे अनेक पीकनोंदी रखडल्या असून, त्यामुळे नुकसान भरपाईही अडचणीत आली आहे. संघटनांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, कृषी व महसूल विभागांनी तातडीने शेतशिवारात जाऊन पंचनामे करून वस्तुस्थितीचा अहवाल शासनास सादर करावा आणि भोर तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करावा.

शासनाने २१ दिवसांत कारवाई न केल्यास, दिनांक १९ ऑगस्ट २०२५ रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय, भोर येथे टाळे ठोक आंदोलन करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा जय शिवराय किसान संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे. यासाठी उद्भवणाऱ्या परिणामांना प्रशासनच जबाबदार राहील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या निवेदनप्रसंगी शेतकरी शामसुंदर जायगुडे (प्रदेश अध्यक्ष जय शिवराय किसान संघटना), संतोष मोहिते (शिव प्रहार), यशवंतराव कदम (बळीराजा शेतकरी संघ), बाळासाहेब जाधव (जिल्हा अध्यक्ष) तसेच विविध गावांतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गस्तीवरील पोलिसांना खडकीत बेदम मारहाण; चौघांना अटक

**पुणे, ता. ०२ :** पुणेकरांच्या सुरक्षिततेसाठी रस्त्यावर गस्त घालणाऱ्या पोलिसांनाच रात्रीच्या अंधारात टोळक्याने रस्त्यावर पाडून अक्षरशः लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. कॉप्स २४ अंतर्गत ड्युटीवर असलेल्या पोलिसांना थेट रस्त्यावर पाडून टोळक्याने मारहाण केल्याची घटना खडकी परिसरातील चर्च चौकात गुरुवारी रात्री घडली. संबंधितांवर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यामुळे पोलीसच असुरक्षित असतील तर सामान्य नागरिकांचे काय? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.




जुनैद इकबाल शेख (वय २७), नफीज नौशाद शेख (वय २५), युनूस युसूफ शेख (वय २५) आणि आरिफ अक्रम शेख (वय २५) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. तर, गोपाल देवसिंह गोठवाल (वय २८) असे मारहाण झालेल्या कर्मचाऱ्याचे नाव आहे. याबाबत गोठवाल यांनी फिर्याद दिली आहे. संबधित कर्मचारी कॉप्स २४ उपक्रमाअंतर्गत गुन्हे शाखेच्या खंडणीविरोधी पथक २ मध्ये नियुक्तीला आहेत. गुरुवारी रात्री फिर्यादी कर्मचारी आणि त्यांचे सहकारी जुन्या पुणे-मुंबई महामार्गावरील चर्च चौक परिसरात पेट्रोलिंग करीत होते. यावेळी जुनैद आणि नफीज हे बेशिस्तपणे दुचाकी चालवीत असल्याचे आढळले. फिर्यादींनी त्यांना थांबवून विचारणा केली असता, जुनैदने पोलिसांशी अरेरावीची भाषा केली आणि तू कोण विचारणारा? असा दम दिला.

दरम्यान, त्यांच्या पाठिमागून दुसरी दुचाकी घेऊन आलेले युनूस आणि आरिफ यांनीही पोलिसांशी वाद घातला. चौघांनी मिळून पोलीस शिपाई गोपाल यांना रस्त्यावर खाली पाडले आणि पाठीत लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. फिर्यादींच्या सहकाऱ्यालादेखील मारहाण करण्यात आली. मारहाणीनंतर सर्व आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. घटनेची माहिती मिळताच खडकी पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत जखमी गोठवाल यांना खासगी रुग्णालयात दाखल केले. आरोपींचा शोध घेऊन काही तासांतच चौघांना अटक करण्यात आली.

> पोलीस कर्मचारी रात्रगस्तीवर होते. भरधाव चाललेल्या दुचाकीस्वारांना अडवून त्यांना विचारणा केल्यानंतर संबंधितांनी कर्मचाऱ्याला मारहाण केली. मारहाणीनंतर पसार झालेल्या टोळक्याला अटक करण्यात आलेली आहे.
>
> - **विक्रमसिंह कदम,** वरिष्ठ पोलीस निरीक्षक, खडकी पोलीस ठाणे

# यवत येथे शांततेचे वातावरण, पोलिसांचा चोख बंदोबस्त; काही संशयित पोलिसांच्या ताब्यात

**राहुलकुमार अवचट**

यवत, ता. ०२ : गेल्या काही दिवसांपासून यवत परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार शुक्रवारी जमावबंदी आदेश लागू करण्यात आला असून शनिवारी (ता. ०२) सकाळपासून यवत मध्ये शांततेचे वातावरण असून परिस्थिती नियंत्रणात आहे. पोलिस प्रशासनाच्या वतीने यवत परिसरात चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला असून नागरिकांना विनाकारण घराबाहेर पडू नये असे आवाहन करण्यात येत आहे.



२६ जुलै रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीची विटंबना झाल्याने यवत येथे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. परंतु शुक्रवार (ता. ०१) रोजी आठवडे बाजार भरत सर्व दैनंदिन व्यवहार सुरळीत चालू झाले. परंतु सोशल मीडियावर टाकलेल्या आक्षेपार्ह पोस्टमुळे यवत येथे मोठा जमाव एकत्र आल्याने तणाव निर्माण झाला. गावातील गरडे वस्ती येथील पोस्ट टाकणाऱ्या तरुणाच्या घराची जाळपोळ करत स्टेशन रोड, इंदिरानगर, सेवा रस्त्यावरील घरे, दुकानांवर दगडफेक तर काही ठिकाणी जाळपोळ केल्याची घटना घडली.

यानंतर पोलिस प्रशासनाने परस्थिती आटोक्यात आणली असून यवतमध्ये जमावबंदी आदेश लागू असल्याने शनिवारी देखील संपूर्ण बाजारपेठ बंद असून सर्वत्र शांतता पसरलेली आहे. गावात चौका चौकात पोलिसांनी चौक बंदोबस्त ठेवला असून कोल्हापूर परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी व पुणे ग्रामीण जिल्हा अधीक्षक संदिप सिंह गिल्ल यांनी घटना स्थळाला भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला आहे.

दरम्यान, रात्री आमदार राहुल कुल यांनी पोलिस स्टेशनला भेट देत परिस्थितीची माहिती घेऊन यवतकरांना शांततेचे आवाहन केले आहे. पोलीस प्रशासनाच्या वतीने देखील विनाकारण नागरिकांनी घराबाहेर पडू नये व सर्वत्र शांतता राखावी, कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये असे आवाहन करण्यात आले आहे. मध्यरात्रीपासून पोलीस प्रशासनाने काही संशयितांना ताब्यात घेतले असून काही जणांचा शोध सुरू असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे.






## संक्षिप्त

### मराठी साहित्य परिषद पुणे जिल्हा (दक्षिण) अध्यक्षपदी रमेश रेडेकर



खेड शिवापूर, ता. ०२ : गेल्या २५ वर्षांहून अधिक काळ मराठी साहित्यसेवा करणारे खेड शिवापूर येथील रमेश रेडेकर यांची अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद पुणे जिल्हा (दक्षिण) जिल्हाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना परिषदेकडून अधिकृत नियुक्तीपत्र प्राप्त झाले आहे. रेडेकर यांनी आपल्या साहित्यप्रवासात काव्य, कथा, निवेदन यांद्वारे श्रोत्यांशी नातं जुळवत मराठी साहित्याची सेवा केली आहे. त्यांनी अनेक शाळांमध्ये मराठी दिनानिमित्त नामवंत साहित्यिकांना घेऊन संमेलने भरवली, तसेच विविध व्यासपीठांवर काव्यसादरीकरण आणि निवेदन केले. त्यांच्या या कार्याची दखल घेत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कडून त्यांना पद्मश्री नारायण सुर्वे पारितोषिक, तसेच गदिमा काव्य पारितोषिक मिळाले आहे. अनेक साहित्यिक संस्थांनीही त्यांचा सन्मान केला आहे.९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात त्यांनी बाप ही कविता सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. साहित्यसेवेबरोबरच त्यांनी स्वच्छता, रांगोळी, निवेदन, साहित्यिकांच्या अडीअडचणी समजून घेणे अशा विविध जबाबदाऱ्या नेटाने पार पाडल्या आहेत. पुणे जिल्ह्यातील साहित्यिक चळवळीला त्यांच्या नेतृत्वामुळे नवे बळ मिळेल, असा विश्वास साहित्यप्रेमींनी व्यक्त केला आहे.



### गायराणातून हजारो रुपयाची काळी माती चोरी; महसूल अधिकाऱ्याच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल

**शिरूर, ता. ०२ :** शिरूर तालुक्यातील कोळगाव डोळस येथील गायराण जमिनीतून तब्बल ५८.५ ब्रास काळी माती अज्ञात चोरट्यांनी बेकायदेशीरपणे उत्खनन करून चोरून नेल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे.याप्रकरणी महसूल अधिकारी हर्षद बाळासाहेब साबळे (वय-२९, रा. बाबुरावनगर, शिरूर) यांच्या फिर्यादीवरून शिरूर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २६ जुलै रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास ते २७ जुलै रोजी सकाळी ७ वाजेपर्यंत घडली असून, कोळगाव डोळस गावच्या गायराण जमिनीमधून शासनाची कोणतीही परवानगी न घेता एकूण ९४ हजार १८५ रुपये किमतीची काळी माती बेकायदेशीररित्या चोरून नेण्यात आली आहे. ही माती अंदाजे सोळाशे दहा रुपये रुपये प्रति ब्रास या दराने चोरी करण्यात आल्याची नोंद फिर्यादीत म्हटले आहे.दरम्यान, या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार गवळी यांच्यामार्फत सुरू आहे. ही घटना प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी असून, स्थानिक पातळीवर बेकायदेशीर उत्खनन रोखण्यासाठी अधिक कठोर उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे नागरिकांकडून सांगितले जात आहे.

# मांडवगण फराटा येथील अतिक्रमणांवर प्रशासनाकडून कारवाई

**योगेश मारणे**

न्हावरे, ता. ०२ : मांडवगण फराटा (ता.शिरूर) येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेच्या हद्दीतील अनेक वर्षांपासून असलेली अतिक्रमणे अखेर ग्रामपंचायत व प्रशासनाच्या संयुक्त कारवाईने हटवण्यात आली. या धडक मोहिमेमुळे शाळेला तब्बल तीन दशकांनंतर स्वतंत्र क्रीडांगण आणि अन्य शैक्षणिक सुविधा निर्माण करण्याची संधी प्राप्त झाली आहे.



शाळेची ३५ गुंठ्यांची मूळ स्वमालकीची जागा असून, याशिवाय १ हेक्टर २१ गुंठे इतकी गायरान जमीन पूर्वीच शाळेसाठी आरक्षित करण्यात आली होती. मात्र, गेल्या २५ ते ३० वर्षांपासून शाळेच्या जागेवर परिसरातील ३० ते ३२ लहान- मोठ्या व्यावसायिकांनी अतिक्रमण केल्याने शाळेच्या विकासासाठी अडथळा निर्माण झाला होता.

दरम्यान, शाळा व्यवस्थापन समितीने वेळोवेळी ग्रामपंचायत व पंचायत समितीकडे शाळेभोवतालची अतिक्रमणे हटवण्यासाठी तक्रारी केल्या होत्या. त्यानंतर २४ ऑक्टोबर २०१७ रोजी शासकीय मोजणी व २ डिसेंबर २०१७ रोजी हद्द निश्चिती करण्यात आली होती. यानंतरही कारवाई लांबणीवर पडत होती. अखेर, सरपंच समीक्षा फराटे-कुरुमकर यांनी निर्णायक पाऊल उचलत कारवाईस सुरुवात केली. गुरुवारी (दि. ३१ जुलै) सकाळी ११ वाजता सुरू झालेली कारवाई व्यावसायिकांच्या विरोधामुळे थांबवावी लागली होती. मात्र, पोलीस बंदोबस्तात दुपारी ३ वाजता पुन्हा अतिक्रमणांवर कारवाई करत संपूर्ण अतिक्रमणे हटवण्यात आली.

> जिल्हा परिषद शाळेच्या जागेवरील अतिक्रमणे कायदेशीर प्रक्रियेनंतर हटवली असून, विद्यार्थ्यांसाठी आता खेळाचे मैदान व विविध उपयुक्त सुविधा उपलब्ध होतील. ही शाळा 'मॉडेल स्कूल' म्हणून निवडण्यात आली आहे.
> **– बाळकृष्ण कळमकर,**
> (गटशिक्षणाधिकारी,शिरूर)

> शाळेच्या गरजा लक्षात घेऊनच आम्ही अतिक्रमण हटवले आहे. गावाच्या विकासात अडथळा ठरणारी कोणतीही अतिक्रमणे भविष्यातही सहन केली जाणार नाहीत.
> **– समीक्षा फराटे–कुरुमकर,**
> (सरपंच, मांडवगणफराटा)

### व्यावसायिक सिलेंडरच्या दरात घट

**मुंबई, ता. ०२ :** तेल कंपन्यांनी १ ऑगस्टपासून व्यावसायिक वापराच्या एलपीजी गॅस सिलेंडरच्या किमतीत कपात केली आहे. १९ किलोच्या व्यावसायिक सिलेंडरच्या दरात ३३.५० रुपयांची घट झाल्यामुळे हॉटेल आणि रेस्टॉरंट चालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. तेल कंपन्याच्या अधाव्यानंतर व्यावसायिक सिलेंडरच्या किमती कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला. दिल्लीत आता व्यावसायिक सिलेंडरची किंमत १६६५ रुपयांवरून १६३१.५० रुपये झाली आहे. मात्र, १४.२ किलोच्या घरगुती सिलेंडरच्या दरात कोणताही बदल न झाल्याने सर्वसामान्य नागरिक निराश झाले आहेत. घरगुती वापराच्या गॅसचे दर स्थिर राहिल्याने सर्वसामान्यांच्या बजेटवर कोणताही सकारात्मक परिणाम झालेला नाही. याआधी व्यावसायिक सिलेंडरचे जुलैमध्ये ५८.५० रुपये, जूनमध्ये २४ रुपये, मेमध्ये १४.५० रुपये आणि एप्रिलमध्ये ४१ रुपयांनी दर कमी झाले होते.

## पळसनाथ विद्यालयात लोकमान्य टिळक व अण्णा भाऊ साठेंना अभिवादन

**संतोष पवार**

पळसदेव, ता. ०२ : भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील महान स्वातंत्र्यसेनानी, तत्वज्ञ राजकारणी, देशभक्त, संपादक लोकमान्य टिळक यांच्या पुण्यदिनानिमित्त आणि लोकशाहीर, लोककवी, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त पळसदेव ता . इंदापूर येथील पळसनाथ विद्यालयात प्रतिमापूजन करण्यात आले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयातील शिक्षकेत्तर सेवक पांडुरंग कुचेकर होते. ब्रिटीश राजवटीविरुद्ध आपल्या लेखनीतून भारतीयामध्ये असंतोष निर्माण करत स्वातंत्र्याची प्रेरणा टिळकांनी निर्माण केली.समाजातील कष्टकरी, कामगार, दलित, उपेक्षित वर्गाच्या दुःख, यातना आपल्या लेखनीतून मांडत कथा कादंबरी लोकनाटय, पोवाडे प्रवासवर्णने आदि विपूल साहित्यसंपदा रचणारे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर विद्यार्थी व उपस्थित शिक्षकांनी विचार व्यक्त केले.

यावेळी विद्यालयाचे प्राचार्य विकास पाठक, पर्यवेक्षक संजय जाधव, संतोष पवार, अशोक जाधव, तानाजी इरकल सुरेश बनकर, अविनाश शेलार, सिकँदर देशमुख, नितीन जगदाळे, सुवर्णा नायकवडी, प्रतिभा कांबळे, उज्ज्वला वाघमारे, शुभांगी कोळी, सुदर्शना पवार, रेश्मा अडवाल आदिंसह शिक्षक शिक्षकेत्तर, विद्यार्थी उपस्थित होते.

## चोरीला गेलेली फॉर्च्यूनर अवघ्या काही तासांत मिळाली

**अक्षय टेमगिरे**

रांजणगाव गणपती, ता. ०२ : शिरूर तालुक्यातील रांजणगाव येथील पाचुंदकर वस्तीवरून चोरीस गेलेली टोयोटा फॉर्च्यूनर चक्१२णग९९५५ ही कार अवघ्या काही तासांत शोधून काढत रांजणगाव एमआयडीसी पोलिसांनी अत्यंत कौशल्यपूर्ण कारवाई केली असुन या तपासात पोलिसांनी दाखवलेल्या तत्परतेचे आणि तांत्रिक उपयोगाचे सर्वत्र कौतुक होत आहे.




चोरीस गेलेली गाडी मूळची पुण्यातील गोरक्ष बत्ते यांची असून, त्यांनी ती वापरासाठी उमेश पाचुंदकर यांच्याकडे दिली होती. ३१ जुलै रोजी रात्री १० वाजेच्या सुमारास पाचुंदकर यांनी गाडी घरासमोर उभी केली होती. परंतु १ ऑगस्ट रोजी सकाळी ती गाडी तिथे दिसून आली नाही. स्थानिक पातळीवर थोडा वेळ शोध घेतल्यानंतर पाचुंदकर यांनी रांजणगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती.

तक्रार प्राप्त होताच पोलिसांनी घटनास्थळी पाहणी करून पंचनामा केला. त्यानंतर सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल टॉवरचे लोकेशन आणि विविध तांत्रिक साधनांचा वापर करत तपास सुरू करण्यात आला. तपासादरम्यान गाडी धुळे जिल्ह्यात असल्याचे निदर्शनास आले. तात्काळ पथक रवाना करून फॉर्च्यूनर गाडी सुरक्षितरीत्या ताब्यात घेण्यात आली.

दरम्यान, या प्रकरणी अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नसली तरी, चोरीमध्ये कोणाचा सहभाग आहे याचा तपास रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन करत आहेत. या जलद कारवाईमुळे ग्रामस्थांत समाधान व्यक्त होत असून, पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## निरोगी अन् मजबूत केसांसाठी खोबरेल तेलात मिसळा यागोष्टी

पुणे : निरोगी केसांमुळे आपल्या सौंदर्यांत आणखी भर पडते. पण हे केस निरोगी राहण्यासाठी त्यांची काळजी घेणे गरजेचे आहे. त्यासाठी केसांना तेलाने मसाज करणे खूप गरजेचे आहे. हेअर मास्क किंवा अन्य कितीही हेअर ट्रीटमेंट घेतल्यातरी केसांना तेल लावायलाच हवे.

शॅम्पू किंवा कंडिशनरने केस कितीही चांगले धुतले तरी केसांना तेलाचा वापर केला नाही तर तुमचे केस मजबूत होऊ शकत नाहीत. तेल निवडताना,आपण केमिकल आधारित केसांचे तेल वापरत आहात की नाही याची काळजी घेणे महत्वाचे आहे. केमिकल बेस तेलांपेक्षा घरच्या घरी तुम्ही आयुर्वेदिक तेल बनवू शकता.

एरंडेल, कापूर आणि खोबरेल तेल : केसांच्या वाढीसाठी, कापूर तेल, एरंडेल तेल आणि खोबरेल तेल समान प्रमाणात मिसळा आणि आपल्या मुळांना आणि केसांना मसाज करा. ते लावण्यापूर्वी डबल बॉयलवर थोडा वेळ गरम करा आणि नंतर वापरा.

कडुलिंब आणि खोबरेल तेल : काही कडुलिंबाची पाने दोन दिवस वाळवावीत. १०० मिली बदाम तेल वाळलेल्या कडुलिंबाच्या पानांसह उकळवा. आठवडाभर पाने तेलात भिजवून ठेवा. नंतर तेल गाळून घ्या आणि ते तुमच्या वापरासाठी तयार आहे.

नारळ आणि कढीपत्ता तेल : मूठभर कढीपत्ता दोन दिवस उन्हात वाळवा. नंतर १०० मिली खोबरेल तेलात उकळवा. गॅस बंद करून थंड होऊ द्या. नंतर हे तेलाचे मिश्रण गाळून घ्या आणि ते केस आणि टाळूची मालिश करण्यासाठी वापरा. यामुळे केसांच्या वाढीस मदत होईल.

काळे तीळ आणि खोबरेल तेल : फुड प्रोसेसरमध्ये एक चमचा काळे तीळ बारीक करा. काचेच्या बाटलीत ऑलिव्ह किंवा खोबरेल तेल भरून त्यात बियांचे चूर्ण टाका. २-३ दिवसात तेल वापरासाठी तयार होईल. जेव्हा तुम्हाला तुमच्या टाळूची मालिश करायची असेल तेव्हा हे तेल थोड्या प्रमाणात गरम करा आणि ते वापरा.



## फाउंडेशननंतर त्वचा निस्तेज, काळी दिसते, तर जाणून घ्या मेकअपचा योग्य मार्ग

**पुणे** : मुली आजकाल गोरी आणि निर्दोष त्वचेसाठी फाउंडेशन वापरतात. त्याऐवजी काही मुली बीबी किंवा सीसी क्रीम लावतात, जे फाउंडेशन म्हणून देखील काम करते. मुलींची तक्रार आहे की फाउंडेशन किंवा बीबी क्रीम लावल्यानंतर त्यांची त्वचा काळी व निस्तेज दिसू लागते. याचे कारण आपण फाउंडेशन योग्यरित्या लावत नाही. आपण काही मेकअप टिप्स जाणून घ्या जेणेकरून फाउंडेशन लावल्यावरही तुमची त्वचा निस्तेज व काळी दिसणार नाही.

फाउंडेशन लावण्याचा योग्य मार्ग

१) सर्व प्रथम, ब्यूटी ब्लेंडर एका भांड्यात पाण्यात बुडवून ठेवा. दरम्यान, फेस वॉश किंवा क्लींजिंग मिल्कने चेहरा चांगले स्वच्छ करा.

२) यानंतर कोरफड जेल घ्या आणि ते त्वचेमध्ये चांगले शोषून घेईपर्यंत चेहऱ्यावर मालिश करा. कोरफड जेल सीरम आणि प्राइमर म्हणून कार्य करते.

३) आता पाण्यातील ब्युटी ब्लेंड बाहेर काढा आणि चांगले पाणी काढून घ्या. लक्षात ठेवा की आपल्या त्वचेच्या शेड्सनुसार, शेड लाइट फाउंडेशन घ्या.

४) आता आपल्या त्वचेच्या प्रकारानुसार चेहऱ्यावर फाउंडेशन डॉट-डॉट करून लावा. रात्रीच्या मेकअपसाठी, थोडे जास्त फाउंडेशन घ्या. आता ब्युटी ब्लेंडर च्या मदतीने, बाउंसिंग करत फाउंडेशन ब्लेंड करा. हे लक्षात ठेवा की कान आणि गळ्याभोवती फाउंडेशन लावण्यास विसरू नका.

५) जर त्वचा तेलकट असेल तर फाउंडेशन लावल्यानंतर कॉम्पॅक्ट पावडर लावा. आता त्यावर मस्कारा, आयलीनर, लिपस्टिक आणि इतर मेकअप लावा.

# शिरूर नगरपरिषदेत निवडणुकीची चाहूल; सर्वच पक्ष मैदानात सक्रिय

**शिरूर, ता. २ :** शिरूर नगरपरिषदेच्या आगामी निवडणुका अवघ्या दोन ते तीन महिन्यांच्या अंतरावर असताना, शहरातील राजकीय हालचालींना वेग आला आहे. मागील काही वर्षांपासून प्रशासकाच्या हातात असलेल्या शिरूर नगरपरिषदेसाठी आता पुन्हा लोकप्रतिनिधींच्या निवडीसाठी वातावरण तयार होत आहे. या निवडणुका पक्षीय चिन्हावर होत नसल्या तरी, विविध पक्षांनी गेल्या काही काळात केलेल्या कामगिरीमुळे मतदारांमध्ये ओळख निर्माण झाली आहे.

शहरातील भाजप, शिवसेनेचे दोन्ही गट (ठाकरे व शिंदे), राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट (शरद पवार व अजित पवार), काँग्रेस, मनसे, जनता





दल, बहुजन मुक्ती पार्टी या पक्षांनी मागील दोन-तीन वर्षांत विविध प्रश्नांवर आंदोलने केली आहेत, तर काहींनी सत्ताधारी असताना विकासकामांसाठी निधी मिळवण्याचे प्रयत्न केले आहेत.

महाविकास आघाडी सरकारच्या काळात तत्कालीन आमदार अशोक पवार यांच्या पुढाकाराने आणि इतर पक्षीय नेत्यांच्या सहकार्याने शहरात विविध विकास कामांसाठी निधी आणण्यात आला होता. त्यानंतर महायुती सरकारच्या काळात माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या प्रयत्नातून शिरूर नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा योजनेसाठी तब्बल ७२ कोटी रुपये मंजूर करण्यात आले.

भाजपने शहरातील अनेक प्रश्नावर सातत्याने आवाज उठवला असून, मनसेचे उपजिल्हाप्रमुख महिबूब सय्यद यांनी देखील विविध नागरी प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा केला. शिवसेना (ठाकरे गट) शहरप्रमुख संजय देशमुख व राष्ट्रवादी (शरद पवार गट) अध्यक्ष मुज्जफर कुरेशी हे दोघे माजी नगरसेवक यांनी नागरिकांच्या प्रश्नांना घेऊन प्रशासन दरबारी प्रयत्न केले.

त्याचप्रमाणे, शिवसेना (शिंदे गट) शहरप्रमुख मयूर थोरात यांनी नगरपालिका शाळेसाठी पाच कोटी रुपयांहून अधिक निधी आणण्यात यश मिळवले. काँग्रेस पक्षानेही आंदोलने करत प्रश्नांकडे लक्ष वेधले, तर बहुजन मुक्ती पार्टीने देखील शहरातील समस्या मांडण्याचं काम केलं.शहरातील राजकीय आणि सामाजिक प्रश्नांवर सातत्याने सक्रिय राहिलेल्या या पक्षांकडून नागरिकांच्या अपेक्षा निश्चितच वाढल्या आहेत. त्यामुळे निवडणूक प्रचारात कोणती बाजू जिंकते, हे पाहणं औत्सुक्याचं ठरणार आहे.

**निवडणुकीतील फायदा अनिश्चित**

सर्वच पक्षांनी विविध स्वरूपात शहरात कामे केली असली तरी, या प्रयत्नांचा प्रत्यक्ष निवडणुकीत किती फायदा होईल, हे सांगणे कठीण आहे. कारण शिरूर नगरपरिषदेच्या निवडणुका नेहमीच अपक्ष पद्धतीने, पक्षचिन्हाशिवाय होत आल्या आहेत. त्यामुळे मतदारांसमोर आपली कामगिरी प्रभावीपणे मांडणे हेच उमदवारांसाठी महत्त्वाचे ठरणार आहे.

## फरार आरोपीला बेड्या




**खडकवासला, ता. ०२ :** सिंहगड पायथ्याच्या आठ हजार लोकसंख्येच्या खानापूर गावात गेल्या महिन्यात बुधवारी २५ जून रोजी दोन गावठी पिस्तूल व कोयत्यांसह तुफान हल्ला करणाऱ्या टोळीचा म्होरक्या प्रणव ऊर्फ चिक्क्या अर्जुन रणधीर (वय २४, रा. खानापूर, ता. हवेली) याला हवेली पोलिसांनी मंगळवारी (ता. २९) रात्री उशिरा पुण्यातील एका ठिकाणी अचानक धाड टाकून जेरबंद केले आहे. खानापूर गावात झालेल्या हल्ल्यात आतापर्यंत अटक करण्यात आलेल्या आरोपींची संख्या ९ वर गेली असून, या हल्लात पाच अल्पवयीन मुलांनाही ताब्यात घेण्यात आले आहे. दरम्यान अल्पवयीन मुलांना आता बालसुधारगृहात पाठवले आहे. हवेली पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सचिन वांगडे यांच्या देखरेखीखाली सहायक पोलिस निरीक्षक अमोल बामणे, अंमलदार संतोष तोडकर, गणेश धनवे, संतोष भापकर, सचिन गुंड यांच्या पथकाने पाळत ठेवून त्याला जेरबंद करून गजाआड केले.

# जिममध्ये व्यायाम करताना ३७ वर्षीय व्यावसायिकाचा हृदयविकाराने मृत्यू

**पिंपरी चिंचवड, ता. ०२ :** पिंपरी चिंचवड शहरातून एक धक्कादायक आणि दुःखद बातमी समोर आली आहे. व्यायाम करत असतानाच एका ३७ वर्षीय तरुणाचा जीममध्येच हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. ही घटना चिंचवडगावातील 'नायट्रो जिम' येथे शुक्रवारी सकाळच्या सुमारास घडली. मिलिंद कुलकर्णी असे या तरुणाचे नाव असून, नियमित व्यायाम करणाऱ्या आणि आरोग्याची काळजी घेणाऱ्या व्यक्तीचा असा अचानक मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मिलिंद कुलकर्णी हे गेल्या सहा महिन्यांपासून नियमितपणे नायट्रो जिममध्ये व्यायामासाठी जात होते.



शुक्रवारी सकाळीही ते नेहमीप्रमाणे व्यायामासाठी आले होते. काही वेळ व्यायाम केल्यानंतर ते थोडा वेळ बसले आणि पाणी प्यायला घेतले. मात्र, काही क्षणातच त्यांना अचानक भोवळ आली आणि ते जागेवरच कोसळले. जिममध्ये उपस्थित असलेल्या इतर सदस्यांनी तात्काळ प्रतिक्रिया देत जवळच असलेल्या मोरया रुग्णालयात त्यांना दाखल केले. परंतु, डॉक्टरांनी तपासल्यानंतर उपचार सुरू होण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे घोषित केले.

डॉक्टरांच्या प्राथमिक अंदाजानुसार, मिलिंद कुलकर्णी यांना तीव्र हृदयविकाराचा झटका आला होता. तातडीने वैद्यकीय मदत मिळूनही, झटका इतका तीव्र होता की त्यांचे प्राण वाचवता आले नाहीत. विशेष म्हणजे, मिलिंद कुलकर्णी यांच्या पत्नी स्वतः डॉक्टर आहेत, अशी माहिती समोर आली आहे.

या घटनेनंतर पुन्हा एकदा तरुण वयात होणाऱ्या हृदयविकाराच्या झटक्यांबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. सुदृढ दिसणारे, नियमित व्यायाम करणारे अनेक तरुण हृदयविकाराच्या झटक्याने मृत्युमुखी पडत असल्याच्या घटना सध्या सातत्याने समोर येत आहेत. हृदयरोग तज्ज्ञांचे म्हणणे आहे की कोणत्याही प्रकारचा व्यायाम सुरू करण्यापूर्वी सखोल आरोग्य तपासणी करणे अत्यंत आवश्यक आहे. शरीराची क्षमता, पूर्वीचे आजार आणि जीवनशैली लक्षात घेऊनच व्यायामाचे प्रमाण आणि स्वरूप ठरवावे, असा सल्ला त्यांनी दिला आहे. या घटनेनंतर नायट्रो जिम व्यवस्थापनाने दुःख व्यक्त करत सांगितले की, मिलिंद कुलकर्णी आमच्या जिममध्ये नियमित येणारे सभासद होते. त्यांचा मृत्यू आमच्यासाठीही धक्कादायक आहे. जिममध्ये पहिल्यांदाच असा प्रकार घडला असून आम्ही संपूर्ण सहकार्य करत आहोत.


> आरोग्याची जाणीव असणारा एक सशक्त तरुण अशा प्रकारे अचानक जाणं, हे नक्कीच दुःखद आहे. योग्य काळजी, तपासणी आणि वैद्यकीय मार्गदर्शनाशिवाय अतिशय ताणतणावयुक्त किंवा जड व्यायाम प्रकार करणे टाळावे.
> - हृदयरोग तज्ज्ञ, पुणे

## भिगवण येथील २७ वर्षीय तरुण बेपत्ता

**सागर जगदाळे**

भिगवण, ता. ०२ : इंदापूर तालुक्यातील भिगवण-स्टेशन येथील शक्ती सुधाकर खडके (वय- वर्षे)हा बुधवार(दि.) पासून घरी काहीही न एक सांगता बेपत्ता झाला आहे. या संदर्भात भिगवण पोलीस ठाण्यात सुधाकर प्रल्हाद खडके (वय- वर्ष धंदा-मजुरी रा-भिगवन स्टेशन,ता-इंदापुर जि-पुणे) बेपत्ता झाल्याची नोंद दाखल केली आहे.

यासंदर्भात अधिक माहिती अशी की, भिगवण ग्रामपंचायतच्या हद्दीतील भिगवण-स्टेशन येथे राहणारा शक्ती खडकेहा तरुण बुधवार रोजी सकाळी अकरा वाजल्यापासून राहत्या घरातून कोणाला काहीही न एक सांगता गायब झाला आहे. घरातील सदस्यांनी व नातेवाईक यांनी त्याचा सर्वत्र शोध घेतला असता तो आढळून आला नाही. म्हणून त्याचे वडील सुधाकर



खडके यांनी गुरुवारी रोजी दुपारी दोन वाजता भिगवण पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल केली.

अंगात नेसनिस चेक्सचा निळ्या लाल रंगाचा फुल बाह्याचा शर्ट, निळ्या रंगाची जिन्स, उंची ५ फुट ९ इंच, केस काळे, बांधा-सडपातळ, रंग गोरा, पायात चप्पल, भाषा मराठी इंग्रजी हिंदी बोलतो. सदर प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार अन्सार शेख हे करीत आहे.

# राज्य शिक्षक पुरस्कारासाठी आवेदनपत्र भरण्यासाठी मुदतवाढ

**संतोष पवार**

पळसदेव, ता. ०२ : शिक्षण हा समाजाच्या सर्वांगीण विकासाचा पाया आहे. समर्पित वृत्तीने काम करणाऱ्या शिक्षकांना दरवर्षी शिक्षकदिनानिमित्त शासनाच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्काराने गौरवले जाते . सावित्रीमाई फुले २०२५ च्या पुरस्कारासाठी मुदत संपुष्टात आल्याने आता मुदतवाढ करण्यात आली आहे. यासाठी इच्छुक शिक्षकांनी ३ ऑगस्टपर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभागाचे शिक्षण संचालक महेश पालकर यांनी केले आहे. शिक्षकांनी आपली आवेदने ३ ऑगस्टपर्यंत दिलेल्या लिंकवर ऑनलाईन सादर करावीत,





असे पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

या पुरस्कारासाठी राज्यातील शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा व मान्यताप्राप्त अनुदानित खासगी प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांना आवेदन सादर करता येणार आहेत. पुरस्कारासाठी आवेदने सादर करणाऱ्या शिक्षकांचा काही जिल्हे तसेच काही प्रवर्ग याबाबत अल्प प्रतिसाद पाहता ऑगस्ट, २०२५ रोजीपर्यंत आवेदने सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यात येत असल्याचे सांगण्यात आले आहे.

आपल्या कार्यालयाअंतर्गत येणाऱ्या प्राथमिक, माध्यमिक शिक्षकांनी जास्तीत जास्त आवेदने सादर करण्यासाठी प्रोत्साहित करावे. पुरस्कारासाठी आवेदने सादर करण्यासाठी सर्व शिक्षकांपर्यंत पुनश्चः स्वतंत्रपणे सूचना/लेखी आदेश निर्गमित करावेत तसेच वर्तमानपत्रात जाहीर करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास पाठवावा, असे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांच्या कार्यालयाने पाठवलेल्या पत्रात नमूद करण्यात आले आहे.

# इंदापुरात प्लॅस्टिकमुक्त शहर मोहीम; नगरपरिषदेतर्फे कारवाईला सुरुवात

**आदित्य बोराटे**

इंदापूर, ता. ०२ : इंदापूर शहरात प्लॅस्टिकमुक्त इंदापूर या संकल्पनेवर आधारित विशेष मोहीम राबविण्यात येत असून, त्याअंतर्गत मुख्य रस्ते, परिसर, बाजारपेठा आणि सार्वजनिक ठिकाणची दुकाने, पदपथालगत विक्रेत्यांच्या दुकानांची तपासणी करत नगरपरिषदेतर्फे कारवाई करण्यात आली. यामध्ये पर्यावरणास घातक असलेल्या प्लॅस्टिकच्या पिशव्या जप्त करून यापुढे दक्षता घेण्याबाबतचे आवाहन करण्यात आले आहे.

शहरातील मुख्य बाजारपेठ, बसस्थानक परिसर, पुणे सोलापूर महामार्गावरील विक्रेते यांची तपासणी करीत सिंगल यूज प्लॅस्टिक वापरणाऱ्या दुकानदारांकडून सर्व प्लॅस्टिकपिशव्या जमा करत यापुढेही कडक कारवाईचा



इशारा देत परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत व्यापारी व स्थानिक नागरिकांना सूचना देण्यात आल्या. या कारवाईत नगरपरिषदेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला होता.

मुख्याधिकारी रमेश ढगे म्हणाले, सध्या प्लॅस्टिकचा वापर वाढल्याने प्रदूषणाची समस्या वाढत आहे. पर्यावरणासाठी घातक असलेल्या प्लॅस्टिकचा वापर टाळून सर्वांनी पर्यावरणपूरक कागदी किंवा कापडी पिशव्या वापरणे आवश्यक आहे. नगरपरिषदेने याअंतर्गत व्यापारी व नागरिकांना पुन्हा पुन्हा सूचना करूनही जर नियम पाळले गेले नाहीत, तर कारवाई करण्यात येणार आहे.

प्लॅस्टिक वापराबाबत दुकानांची तपासणी करत असताना अतिक्रमणा मुळे ज्या भागात नागरिकांना चालण्यास किंवा वावरण्यास अडथळे निर्माण होत आहेत, अशा भागांतील विक्रेत्यांना स्वतः हून अतिक्रमण काढून घेण्याचे आवाहन मुख्याधिकारी रमेश ढगे यांनी केले. असे न केल्यास आगामी काळात कारवाईला सामोरे जावे लागणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला.



# मालखेड येथे माजी विद्यार्थी मेळावा संपन्न

**खडकवासला, ता. ०२ :** काळभैरवनाथ माध्यमिक विद्यालय मालखेड (ता. हवेली) या विद्यालयात सन २००३-०४ बॅचचा माजी विद्यार्थी मेळावा नुकताच संपन्न झाला. सर्व प्रथम स्वर्गीय नामदार चंदुकाका जगताप यांच्या प्रतिमेचे पूजन सर्व उपस्थित माजी विद्यार्थी यांनी केले. याप्रसंगी सर्व माजी विद्यार्थी इयत्ता दहावीच्या वर्गात बसून त्यांच्या विद्यार्थी दशेतील जुन्या आठवणींना उजाळा देत भावविश्वात रमून गेले.

यावेळी सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सत्कार माजी विद्यार्थी यांनी करून आठवण म्हणून विद्यालयास स्मार्ट टीव्ही ही भेट देण्यात आली. प्रास्ताविक मुख्याध्यापक नंदकुमार बारवकर यांनी केले. माजी विद्यार्थ्यांच्या वतीने विनोद माळवे, विकी भालेराव यांनी मनोगत व्यक्त केले.

दरम्यान, सदर आनंददायी माजी विद्यार्थी मेळाव्यास सचिन खाटपे, योगेश नलावडे, विकी भालेराव शेखर खाटपे ,विनोद माळवे, उमेश गोऱ्हे, चेतन शेडे, नितीन थोपटें, प्रकाश खाटपे, युवराज नलावडे, हिरामण कोकाटे उपस्थित होते. हा मेळावा यशस्वी व्हावा यासाठी वळवी अजित, गोलांडे कृष्णप्रिया, भालेराव कोमल, गवळी भास्कर, खोमणे अशोक,शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. सुत्रसंचलन् विलास जोरी सर यांनी केले. आभार शंकर भगत सर यांनी मानले.

## शिक्रापूर येथे लॉजमधील वेश्या व्यवसायावर छापा

**शिक्रापूर, ता. ०२ :** शिक्रापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शारदा लॉजवर सुरु असलेल्या वेश्या व्यवसायाचा शिक्रापूर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी पोलिसाने ५ महिलांची सुटका केली असून लॉज चालक संतोष सीना पुजारी (वय ३७,रा. शिक्रापूर) यालापोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी संतोष पुजारी हा स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी लॉजमध्ये वेश्याव्यवसाय करवून घेत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसानी शारदा लॉजवर पोलिसांनी छापा टाकला. धडक कारवाई करत पाच महिलांची सुटका केली आहे. या धडक कारवाईत पोलीस निरीक्षक दीपरतन गायकवाड, सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल देशमुख, पोलीस हवालदार पारखे, पाटील, महिला पोलीस जोंधळे, पोलीस कॉन्स्टेबल कारकूड, यांनी सक्रिय सहभाग घेत तात्काळ हालचाल करत एकूण पाच पीडित महिलांची सुटका केली आहे.

# रोहिदास उंद्रे यांचा अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला

## मांजरीतील बनावट ग्रामसभा प्रकरण

**हडपसर, ता. ०२ :** मांजरी खुर्द (ता. हवेली) ग्रामपंचायतीच्या बनावट ग्रामसभा व खोट्या ठरावांच्या प्रकरणी हवेली बाजार समितीचे संचालक रोहिदास दामोदर उंद्रे व आणखी दोघांचा अटकपूर्व जामीन अर्ज सोमवारी (ता. २८) पुण्याच्या अतिरिक्त सत्र न्यायालयाने फेटाळला.

मांजरी खुर्द (ता. हवेली) येथे २८/०२/२०२० रोजी खोटी, बनावट व बोगस ग्रामसभा दाखवणारे तत्कालीन ग्रामपंचायत सदस्य व इतर यांची तात्काळ चौकशी करून त्यांच्या विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याबाबतची तक्रार संदीप उंद्रे यांनी दाखल केली होती. सदर प्रकरणी, प्राप्त चौकशी अहवालाच्या अनुषंगाने फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पुणे यांनी दिले होते. त्यानुसार वाघोली पोलीस ठाण्यात ९ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आले होते.

सदर गुन्ह्यातील मुख्य आरोपी रोहिदास दामोदर उंद्रे व इतर यांनी पुणे येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता. प्रस्तुतचा जामीन अर्ज फेटाळणे बाबत वाघोली पोलीस ठाण्याच्या वतीने सरकारी वकिलांनी युक्तिवाद सादर केला होता. आरोपी तसेच सरकारी पक्षाचा युक्तिवाद ऐकून अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश यांनी आरोपी रोहिदास उंद्रे तसेच ग्राम पंचायत कर्मचारी रामदास शिवराम उंद्रे व विठ्ठल सुभाष सावंत यांचा जामीन अर्ज फेटाळला आहे.

याअगोदर या प्रकरणात आरोपी रामदास शिवराम उर्फ शिवाजी उंद्रे व विठ्ठल सुभाष सावंत यांचेही अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळण्यात आले आहेत.



हे प्रकरण फेब्रुवारी २०२० मधील असून, ग्रामसभेच्या खोट्या नोंदी करून शंभू महादेव ट्रस्टची १ हेक्टर जमीन गुरुकुल एज्युकेशन सोसायटी व सोशल फाउंडेशनच्या नावे फेरफार करण्यात आल्याचा आरोप आहे.

फिर्यादी संदीप उंद्रे यांनी माहिती अधिकारातून मिळालेल्या दस्तऐवजांच्या आधारे पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या चौकशी समितीकडे तक्रार दाखल केली होती. चौकशीनंतर सादर केलेल्या अहवालात ग्रामसभा न घेता खोटे ठराव मंजूर केल्याचे स्पष्ट झाले. सरकारी पक्षाने दिलेल्या युक्तिवादात नमूद करण्यात आले की, आरोपी रोहिदास उंद्रे यांनी या बनावट बैठकीत सक्रिय सहभाग घेतला असून, त्यांच्याकडून तपासासाठी माहिती मिळवणे आवश्यक आहे. पुरावे आणि सह्या मिळविण्याच्या संदर्भात त्यांची सखोल चौकशी अपेक्षित आहे.

दरम्यान, न्यायालयाने म्हटले की, या प्रकरणातील आरोप गंभीर स्वरूपाचे असून तपास पूर्ण व्हायच्या अगोदर आरोपीला अटकपूर्व जामीन दिल्यास तो पुरावे नष्ट करू शकतो किंवा तपासात अडथळा निर्माण होऊ शकतो. त्यामुळे आरोपी रोहिदास उंद्रे यांना सध्या अटकपूर्व संरक्षण देणे योग्य नाही. आदेश पुणे जिल्हा व सत्र न्यायालयाचे अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्री. ए.एस. वाघमारे यांनी दिला. त्यामुळे आता रोहिदास उंद्रे यांचीही अटक शक्यता वाढली आहे.